महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
CIN: U40109MH2005SGC153645

औद्योगिक संबंध विभाग,
प्रकाशगड, प्लॉट जी -९, ४ था मजला,
प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. ६९८५२२००
Email : ciro@mahadiscom.in
irdho123@gmail.com
website- www.mahadiscom.in

जा. क्र. औसंवि/ब/ककनिस/शिष्यवृत्ती-२०२५/ 29090 दिनांक : 10 SEP 2025

# परिपत्रक

**विषय** :म.रा.वि.मं.कर्मचारी कल्याण निधीमधून म.रा.वि.सुत्रधारी कंपनी व महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपन्यांतील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता शिष्यवृत्ती, रोखपारितोषिक देण्याबाबत.

**********

माहे मार्च / एप्रिल - २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत (इयत्ता १०वी) व उच्च - माध्यमिक शालांत (इयत्ता १२वी) परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या तसेच, यापूर्वी मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती पुढे सलगपणे चालू ठेवण्यासाठी तिन्ही कंपन्यांतील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधीमधून शिष्यवृत्ती मंजूरीकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

या परिपत्रकासोबत विहीत अर्जाचा **नमुना (अ), (ब) व (क)** जोडला असून, संबंधीत कर्मचाऱ्यांनी आपल्या पाल्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज विहीत नमुन्यामधील सर्व रकाने सुस्पष्ट भरुन विहीत कालावधीत संबंधीत कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

**प्रपत्र - (अ) / (ब ) व (क) सादर करावयाचा कालावधी :-**

म.रा.वि.सुत्रधारी कंपनी मर्यादित व महावितरण / महापारेषण / महानिर्मिती कंपन्यांतील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पाल्यांना नव्याने शिष्यवृत्ती मिळण्यासाठी [नमुना प्रपत्र- (अ) (इ.१०वी) व प्रपत्र- (क) (इ.१२वी)] तसेच यापूर्वी मंजूर झालेली शिष्यवृत्ती पुढे सलगपणे चालू ठेवण्यासाठी नमुना प्रपत्र-(ब) **दि.३१.१०.२०२५ पर्यंत अथवा त्यापूर्वी संबंधीत कार्यालयास सादर करावे.**

**प्रपत्र - (अ) व (क) करिता पात्रता:-**

पात्रता :

कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना **माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१०वी)** व **उच्च शालांत प्रमाणपत्र परिक्षा(इ.१२वी)** यामध्ये **खुल्या प्रवर्गासाठी** कमीत कमी **६५ टक्के** व **राखीव प्रवर्गासाठी** कमीत कमी **६० टक्के गुण** मिळालेले असतील असेच पाल्य शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज करु शकतात.

**प्रपत्र - (अ)** फक्त माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा **(इ.१०वी) सन -२०२५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी / पाल्यांसाठी आहे.** जे पाल्य उपरोक्तप्रमाणे पात्रता पूर्ण करत असतील अशाच पाल्यांनी अर्ज सादर करावे. त्यानुसार सदर पाल्यांना रोख पारितोषिकासह शिष्यवृत्ती अदा केली जाईल. सदर प्रपत्र भरतेवेळी प्रपत्रातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा अपूर्ण व विलंबाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**प्रपत्र - (क)** ज्या पाल्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१०वी) उत्तीर्ण झाल्यावर त्यावेळी (प्रपत्र-अ) **सादर केला नसल्यास** अशा कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी **उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१२वी) सन २०२५ च्या माहे मार्च मध्ये उत्तीर्ण झाल्यानंतर** नव्याने शिष्यवृत्ती मिळण्याकरिता (प्रपत्र-क) सादर करावयाचा आहे. सदर प्रपत्र भरतेवेळी प्रपत्रातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा अपूर्ण व विलंबाने प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**प्रपत्र - (अ) व (क) भौगोलिक कार्यक्षेत्राप्रमाणे परिपूर्ण अर्ज सांघिक कार्यालयास सादर करावयाची प्रक्रिया :-**

१) <u>**महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांसाठी**</u> **:** कर्मचाऱ्यांना कुठूनही Online शिष्यवृत्तीचे अर्ज भरता यावे याकरिता Employee Portal च्या मार्फत ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. कर्मचाऱ्यांने आपल्या पाल्याचे अर्ज **Employee Portal अंतर्गत Application या मथळ्याखालील Application for Scholarship of ward येथे क्लिक करुन Online शिष्यवृत्तीचा अर्ज भरावयाचा आहे. सदर अर्जासोबत दिलेल्या सुचनेनुसार नमूद केलेली कागदपत्रे Upload करुन पाल्यांचा अर्ज Submit करावयाचा आहे. अर्ज Save केल्यानंतर Submit न केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी. सदर अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. ३१.१०.२०२५ आहे.**

२) <u>**महानिर्मिती व महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पाल्यांचे अर्ज**</u> ('प्रपत्र -अ व क') आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह, ते ज्या कार्यालयात काम करतात त्या कार्यालयाकडे विहीत मुदतीतच सादर करावेत. दि.३१.१०.२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची संबंधीत कार्यालयांनी त्यांच्या स्तरावर छाननी करुन सर्व निकष पूर्ण करीत असलेल्या व वरीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रांसह प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची एक्सेल (Excel) मध्ये सोबतच्या नमुन्यात वर्गवारी न करता एकत्रितपणे संकलित करुन त्यांची Soft Copy व प्रिंट आऊट **संबंधीत कंपनीच्या (महानिर्मिती / महापारेषण) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांच्याकडे दि.१०.११.२०२५ पर्यंत सादर करावी.**

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी - महानिर्मिती व महापारेषण यांनी सदर अर्जाची माहिती परिमंडलनिहाय, सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये Soft Copy व प्रिंट आऊट मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण यांच्याकडे दि.१०.११.२०२५ पर्यंत अथवा त्यापूर्वी पाठवावी.

५१ व्या म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार विशेष सुचित करण्यात येते की, कर्मचारी पाल्यांचे शिष्यवृत्ती मिळण्याबाबतचे विहीत नमुन्यात प्राप्त झालेले अर्ज संबंधीत कार्यालयाकडून पुढील कार्यवाहीसाठी या परिपत्रकातील निर्देशानुसार विहीत मुदतीत पाठविण्यास विलंब झाल्यास व त्यामुळे कर्मचारी पाल्य शिष्यवृत्ती मिळण्यापासून वंचित राहिल्यास अशा विलंबास प्रत्यक्षपणे संबंधीत कार्यालयातील कर्मचाऱ्यास दोषी / जबाबदार धरण्यात येईल.

**प्रपत्र - (ब) :- यापूर्वी मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती पुढे सलगप्रमाणे चालू ठेवण्याबाबतची प्रचलित पध्दती सन २०२५-२६ करिता महानिर्मिती व महापारेषण कंपनीकरिता कायम राहील.**

**मात्र, महावितरण** कंपनीतील कर्मचाऱ्यांनी आपल्या पाल्यांचे अर्ज हे **प्रपत्र-'ब'** प्रमाणे **Employee Portal अंतर्गत Application या मथळ्यातंर्गत Application for Scholarship of ward येथे भरावेत. सदर अर्जासोबत दिलेल्या सुचनेनुसार नमूद केलेली कागदपत्रे Upload करुन पाल्यांचा अर्ज Submit करावयाचा आहे. अर्ज Save करुन Submit न केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही यांची कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी. सदर अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि.३१.१०.२०२५ आहे.** Online अर्जामध्ये दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा अपुर्ण व विलंबाने Submit झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच **याबाबत कोणतेही स्मरणपत्र न देता अपूर्ण असलेला अर्ज दफ्तरी दाखल करण्यात येईल.**

म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या दि.०८.१०.२००१ रोजी झालेल्या ३५ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची शिष्यवृत्ती पुढे चालू ठेवण्यासाठी खालील निकष ठरविण्यात आले आहेत. त्या निकषाची पूर्तता होणे आवश्यक आहे.

❖ यापूर्वी मंजूर झालेली शिष्यवृत्ती पुढे सलगपणे चालू ठेवण्यासाठी खुल्या प्रवर्गातील (open Category) व राखीव प्रवर्गातील (Reserved Category) पाल्याने माध्यमिक व उच्च-माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेनंतरच्या (१० वी व १२ वी नंतरच्या) अभ्यासक्रमाच्या प्रत्येक परिक्षेत कमीत कमी खालीलप्रमाणे गुण संपादन करणे बंधनकारक आहे.

| अभ्यासक्रम | खुला प्रवर्ग (Open Category) | राखीव प्रवर्ग (Reserved Category) |
|---|---|---|
| ११ वी व त्यानंतरच्या परिक्षा, पदविका किंवा पदवी पूर्ण होईपर्यंत | कमीत कमी ५० टक्के | कमीत कमी ४५ टक्के |

❖ जे पाल्य चालू वर्षी सर्व विषयांत पास झाले नसतील तथापि, त्यांना पुढील वर्गात प्रवेश (ATKT) देण्यात आलेली असेल त्यांना देखील पास झाल्यावर गुणपत्रिका सादर करण्याच्या व कमीत कमी वरीलप्रमाणे गुण संपादन करण्याच्या अटीवर ५०% शिष्यवृत्ती अदा करावी. उर्वरित ५०% शिष्यवृत्ती सर्व विषयांत पास झाल्यानंतर गुणपत्रिका प्राप्त झाल्यानंतर तपासून अदा करावी.

❖ प्रपत्र-ब अर्जासोबत चालू वर्षाची गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र (राखीव प्रवर्गासाठी), जात पडताळणी प्रमाणपत्र (अनुसूचित जमातीच्या प्रवर्गाकरीता) व पुढील वर्गात प्रवेश घेतल्याबाबत प्रवेश फी पावतीची किंवा बोनाफाईड प्रमाणपत्राची **साक्षांकित** प्रत जोडणे / Online upload करणे बंधनकारक आहे.

म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीने माध्यमिक / उच्च माध्यमिक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मंजूर केलेली शिष्यवृत्ती पुढील शिक्षणासाठी सलगपणे चालू ठेवण्यास मंजूरी देण्याचे अधिकार सांघिक कार्यालयाकरिता सदस्य / सचिव, म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समिती तथा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण आणि क्षेत्रीय कार्यालयातील विविध परिमंडलांकरिता सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/ब/शिष्य/२०११-१२/२०८५० दि.०२.७.२०११ मध्ये नमूद केलेल्या परिमंडलनिहाय क्षेत्रीय कार्यालयातील मुख्य अभियंता, महावितरण यांना प्रदान करण्यात आले आहेत.

सबब, महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पाल्यांचे शिष्यवृत्ती पुढे सलगपणे चालू ठेवण्यासाठी 'प्रपत्र -ब' नमुन्यामधील अर्ज ते ज्या ठिकाणी काम करतात त्या परिमंडलाच्या मुख्य अभियंता / उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण यांच्याकडे **Employee Portal मधील Application या मथळ्याखाली Application for Scholarship of ward** यामध्ये सादर करावेत. संबंधीत परिमंडलातील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी प्राप्त अर्जावर आवश्यक कार्यवाही करुन सलगता शिष्यवृत्ती आदेश आपल्या स्तरावर निर्गमित करावेत.

**महावितरण - सांघिक कार्यालयमधील** कर्मचाऱ्यांनी देखील त्यांचे अर्ज वरील पध्दतीने **ONLINE Employee Portal** द्वारेच सादर करावेत. Online Employee Portal द्वारे अर्ज भरताना कर्मचाऱ्यांनी ते Save केल्यानंतर Submit करावयाचे आहे. अर्ज Submit न केल्यास त्याचा विचार होणार नाही यांची नोंद घ्यावी.

**महानिर्मिती, महापारेषण या दोन्ही कंपनीतील कर्मचारी पाल्यांचे, शिष्यवृत्ती पुढे सलगपणे चालू ठेवण्याबाबतचे अर्ज 'प्रपत्र -ब' पूर्वीप्रमाणेच या वर्षी देखील भौगोलिक कार्यक्षेत्रानुसार संबंधीत परिमंडलांचे मुख्य अभियंता / उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण यांच्याकडेच पाठवावेत.**

**महानिर्मिती, महापारेषण - सांघिक कार्यालयमधील** कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पाल्यांचे सलगता शिष्यवृत्ती अर्ज त्यांच्या मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती, महापारेषण यांच्या मार्फत मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण यांच्याकडे सादर करावेत.

सदर बाबतीत असेही नमूद करण्यात येते की, ज्या पाल्यांचे परिक्षा निकाल विहीत तारखेच्या अगोदर लागलेले नसताना किंवा त्यांना विहीत तारखेपर्यंत म्हणजेच दि.३१.१०.२०२५ पर्यंत गुणपत्रिका मिळाली नसल्यास त्यांनी सदर अर्जामध्ये **परिक्षांचे निकाल प्राप्त झाल्यानंतर गुणपत्रिका सादर करण्यात येईल** असे स्पष्टपणे नमूद करावे व अर्ज विहीत तारखेच्या आत म्हणजेच दि.३१.१०.२०२५ पर्यंत अथवा त्यापूर्वी सादर करणे बंधनकारक आहे. विहीत तारखेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. परंतु अर्जासोबत निकाला अभावी गुणपत्रिका सादर न करणाऱ्या कर्मचारी पाल्यांनी त्यांच्या अर्जात वरीलप्रमाणे उल्लेख करुन विहीत मुदतीत अर्ज सादर केल्यास कर्मचारी पाल्यांचा शिष्यवृत्ती पुढे सलगपणे चालू ठेवण्यासाठीचा सन २०२५-२६ या वर्षाचा हक्क अबाधित राहील.

म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ६७ व्या बैठकीत वाढीव शिष्यवृत्तीबाबत घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे प्रसारीत करण्यात आलेल्या सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र.२५३५ दि. २५.०१.२०२० नुसार कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून माध्यमिक शालांत परिक्षा, उच्च माध्यमिक शालांत परिक्षा व यापूर्वी शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे ती शिष्यवृत्ती पुढे सलगपणे पदवी परिक्षा पूर्ण करेपर्यंत खालीलप्रमाणे प्रतिमाह देय राहील.

| अ.क्र. | अभ्यास क्रम | प्रतिमाह शिष्यवृत्तीची रक्कम |
|---|---|---|
| १ | इयत्ता ११, १२ व पदविका प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष | रु.५००/- |
| २ | इयत्ता १२ वी उत्तीर्ण करुन किंवा पदविका पूर्ण झाल्यानंतर पदवी या अभ्यास क्रमासाठी प्रवेश घेतल्यास पदवी पूर्ण होईपर्यंत. | रु.८००/- |

वरील निर्देशित नमुना प्रपत्र - (अ), (ब) व (क) अर्जातील संपूर्ण माहिती सत्य, सुस्पष्ट असावी तसेच सदर अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा असे अर्ज शिष्यवृत्तीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत व संबंधीत पाल्य वरील लाभ मिळण्यापासून वंचित राहील यांची नोंद घ्यावी. महावितरणमधील कर्मचाऱ्यांनी पाल्यांचे अर्ज Online Employee Portal द्वारे भरावे व आवश्यक ती कागदपत्रे Upload करावी.

**कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५१ व्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार विशेष सुचित करण्यात येते की, कर्मचारी पाल्यांचे शिष्यवृत्ती मिळण्याबाबतचे विहीत नमुन्यात प्राप्त झालेले अर्ज संबंधीत कार्यालयाकडून पुढील कार्यवाहीसाठी या परिपत्रकातील निर्देशानुसार विहीत मुदतीत पाठविण्यास विलंब झाल्यास प्रत्यक्षपणे जबाबदारी निश्चित करुन दोषी कर्मचाऱ्यास जबाबदार धरण्यात येऊन शिष्यवृत्तीची पदवीपर्यंतची सर्व रक्कम दोषी कर्मचाऱ्यांच्या पगारातून वसूल केली जाईल.**

**वरील परिपत्रक आपल्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या सर्व कर्मचारी /अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे व या परिपत्रकास उपविभागीय तसेच शाखा कार्यालय पातळीपर्यंत व्यापक प्रसिध्दी द्यावी, जेणे करुन कर्मचाऱ्यांना विहीत कालावधीत अर्ज सादर करणे शक्य होईल.**

**सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या E-Library व Employee Portal अंतर्गत Industrial Relations Department येथे येथे प्रसिध्द करण्यात आले आहे.**

(संजय रा. ढोके)
**सदस्य / सचिव, म.रा.वि.मं.क.क.क.नि.स.तथा**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

सोबत : वरीलप्रमाणे.
विहीत नमुना प्रपत्र - अ, ब व क.

C:\Users\ADMIN\Downloads\Scholarship circular 2025 1.doc

प्रति,

१. **मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिमिती / महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई.**

- यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकास आपल्या कंपनीच्या स्तरावर योग्य प्रसिध्दी देण्यात येवून आपल्या कंपनीतील कर्मचाऱ्यांचे **प्रपत्र - अ व 'प्रपत्र -क'** अर्ज एक्सेल (Excel) मध्ये सोबतच्या नमुन्यात, वर्गवारी न करता एकत्रितपणे संकलित करुन Excel PDF with Soft File E-mail द्वारे या कार्यालयाकडे दि. १०.११.२०२५ पर्यंत पाठविण्यात यावी.

२. **उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण, अकोला / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / भांडूप / बारामती / चंद्रपूर / गोंदिया / कल्याण / कोल्हापूर / लातूर / जळगांव /नाशिक / पुणे / नागपूर / रत्नागिरी / नांदेड.**

- यांना कळविण्यात येते की, आपणाकडे Online पध्दतीने Employee Portal द्वारे प्राप्त झालेले सर्व अर्ज Online तपासून त्रुटी असल्यास त्याची पुर्तता करुन सर्व अर्ज Employee Portal मध्ये दि.१०.११.२०२५ पर्यंत अद्ययावत करणे व त्याचा अहवाल सांघिक कार्यालयास कळवावा.

महावितरण

## औद्योगिक संबंध विभाग

## प्रपत्र नमुना- ('अ')

### फक्त माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यासाठी

### (अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.३१.१०.२०२५)

१) अर्जदाराचे नांव (पाल्याचे नाव) :
(आडनाव प्रथम)

२) वडिलांचे / आईचे नाव:
(आडनाव प्रथम)

३) हुद्दा:

४)भविष्य निर्वाह निधी क्रमांक ☐☐☐☐☐☐☐☐

५) कर्मचाऱ्याचा भ्रमणध्वनी क्रमांक :

६) कर्मचाऱ्याची ईमेल आयडी :

७)वडिल / आई कार्यरत असलेल्या ठिकाणाचा :
संपूर्ण पत्ता ( कामाचे ठिकाण, विभाग, मंडल, परिमंडल व सांघिक कार्यालयाकरिता विस्तारीत क्र.)

८) वेतनगट: (लागू असेल त्याठिकाणी [✓] अशी खूण करावी)

| एक | दोन | तीन | चार |
|---|---|---|---|
| ☐ | ☐ | ☐ | ☐ |

९) जात: (लागू असेल त्याठिकाणी [✓] अशी खूण करावी)
व जातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत जोडावी.

१) अनुसूचित जाती ☐
२) अनुसूचित जमाती ☐
३) विमुक्त जाती / भटक्या जमाती ☐
४) इतर मागासवर्गीय ☐
५) खुला वर्ग (Open) ☐

१०) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा :
व तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्याची तारीख

११) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा : अ) केंद्र
व तत्सम परीक्षेला बसलेल्या ब) एस. एस. सी. बोर्डाचे नाव
शाळेचे व केंद्राचे नाव व पत्ता क) शाळेचे नाव

१२) मिळालेले एकूण गुण व गुणांची टक्केवारी :
अ) एकूण गुण _______
ब) मिळालेले गुण ______
क) गुणांची टक्केवारी _____

१३) पुढील शिक्षण चालू ठेवण्यासाठी ज्या : शाळेत / कॉलेजात प्रवेश घेतला त्याचे नाव व पत्ता (प्रवेश घेतल्याचा दाखला सोबत जोडावा)

**महत्वाची सुचना :**

१. गुणपत्रिका व प्रवेश फी पावतीची साक्षांकित प्रत जोडावी.
२. कर्मचाऱ्याचा पाल्य मागासप्रवर्गात मोडत असल्यास पाल्यांच्या जातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत.
३. कर्मचाऱ्याचा पाल्य अनुसुचित जमाती या मागासप्रवर्गातील असल्यास पाल्याच्या / कर्मचाऱ्याच्या जातीच्या दाखल्याची जात वैधता प्रमाणपत्रासह साक्षांकित प्रत जोडावी.

**अर्जदाराची सही**

**मी, श्री. / श्रीमती ________________________________________ हुद्दा ____________________ महावितरण / महानिर्मिती / महापारेषण कंपनीच्या ____________ या कार्यालयामध्ये काम करीत असून, असे नमूद करतो / करते की, माझा पाल्य कुमार / कुमारी ___________________________ याच्या संदर्भात वरीलप्रमाणे मी दिलेली माहिती सत्य आहे.**
**संपर्कासाठी माझा भ्रमणध्वनी क्रमांक __________________ असा आहे.**

**कर्मचाऱ्याची सही**

दिनांक :

प्रती :

असे प्रमाणित करण्यात येते की, माझ्या माहितीनुसार संबंधीत कर्मचाऱ्याने त्याच्या पाल्यासंदर्भात वर दिलेली माहिती पडताळून पाहण्यात आली असून ती बरोबर आहे.

**नियंत्रण अधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का**

महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

# औद्योगिक संबंध विभाग

## प्रपत्र नमुना- ('ब')

## शिष्यवृत्ती सलगपणे चालू ठेवण्यासाठी (Continuation) कराव्या लागणाऱ्या अर्जाचा नमुना

**(अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३१.१०.२०२५)**

१) अर्जदाराचे नांव (पाल्याचे नाव) :
(आडनाव प्रथम)

२) वडिलांचे / आईचे नावः
(आडनाव प्रथम)

३) हुद्दाः

४)भविष्य निर्वाह निधी क्रमांक ☐☐☐☐☐☐☐☐

५) कर्मचाऱ्याचा भ्रमणध्वनी क्रमांक :

६) कर्मचाऱ्यांची ईमेल आयडी :

७)वडिल / आई कार्यरत असलेल्या ठिकाणाचा :
संपूर्ण पत्ता ( कामाचे ठिकाण, विभाग, मंडल, परिमंडल व सांघिक कार्यालयाकरिता विस्तारीत क्र.)

८) वेतनगटः (लागू असेल त्याठिकाणी [✓] अशी खूण करावी)

| एक | दोन | तीन | चार |
|---|---|---|---|
| ☐ | ☐ | ☐ | ☐ |

९) जात: (लागू असेल त्याठिकाणी [✓] अशी खूण करावी) व जातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत जोडावी.

१) अनुसूचित जाती ☐
२) अनुसूचित जमाती ☐
३) विमुक्त जाती / भटक्या जमाती ☐
४) इतर मागासवर्गीय ☐
५) खुला वर्ग (Open) ☐

१०) अ) मागील वर्षी झालेली परीक्षा व तारीख :

ब) एकूण मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी :
i) एकूण गुण____
ii) मिळालेले गुण ____
iii) गुणांची टक्केवारी ____

क) आता कोणत्या वर्गात शिकत आहेत :

११) मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळाली होती का ? : होय / नाही.
असल्यास कार्यालयीन आदेशाचा संदर्भ क्रमांक व तारीख नमूद करावी.
उत्तर होय असल्यास
कार्यालयीन आदेश क्र. ----
दिनांक -------

***कर्मचाऱ्यांनी मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळालेल्या कार्यालयीन आदेशाचा क्रमांक व दिनांक तसेच कार्यालयीन आदेशाची प्रत अर्जासोबत सादर न केल्यास सदर कर्मचारी पाल्याचा अर्ज अपूर्ण समजण्यात येवून शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार नाही याची कर्मचाऱ्यानी नोंद घ्यावी.**

१२) पुढील शिक्षण चालू ठेवण्यासाठी ज्या :
शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतला त्याचे नाव
व पत्ता (प्रवेश घेतल्याचा दाखला सोबत जोडावा)

**<u>महत्वाची सुचना :</u>**

१. गुणपत्रिका व प्रवेश फी पावतीची साक्षांकित प्रत जोडावी.
२. कर्मचाऱ्याचा पाल्य मागासप्रवर्गात मोडत असल्यास पाल्यांच्या जातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत.
३. कर्मचाऱ्याचा पाल्य अनुसुचित जमाती या मागासप्रवर्गातील असल्यास पाल्याच्या / कर्मचाऱ्याच्या जातीच्या दाखल्याची जात वैधता प्रमाणपत्रासह साक्षांकित प्रत जोडावी.

**अर्जदाराची सही**

**मी, श्री. / श्रीमती ______________________________**
**हुद्दा ____________________ महावितरण / महानिर्मिती / महापारेषण कंपनीच्या ____________ या कार्यालयामध्ये काम करीत असून, असे नमूद करतो / करते की, माझा पाल्य कुमार / कुमारी ______________________ याच्या संदर्भात वरीलप्रमाणे मी दिलेली माहिती सत्य आहे.**
**संपर्कासाठी माझा भ्रमणध्वनी क्रमांक ________________ असा आहे.**

**कर्मचाऱ्याची सही**

दिनांक :
प्रती :

असे प्रमाणित करण्यात येते की, माझ्या माहितीनुसार संबंधीत कर्मचाऱ्याने त्याच्या पाल्यासंदर्भात वर दिलेली माहिती पडताळून पाहण्यात आली असून ती बरोबर आहे.

**नियंत्रण अधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का**

**महावितरण**

## औद्योगिक संबंध विभाग

### प्रपत्र नमुना- ('क')

### फक्त उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१२वी) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी
### (अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३१.१०.२०२५)

१) अर्जदाराचे नांव (पाल्याचे नाव) :
(आडनाव प्रथम)

२) वडिलांचे / आईचे नाव:
(आडनाव प्रथम)

३) हुद्दा:

४)भविष्य निर्वाह निधी क्रमांक ☐☐☐☐☐☐☐

५) कर्मचाऱ्याचा भ्रमणध्वनी क्रमांक :

६) कर्मचाऱ्याची ईमेल आयडी :

७)वडिल / आई कार्यरत असलेल्या ठिकाणाचा :
संपूर्ण पत्ता ( कामाचे ठिकाण, विभाग, मंडल, परिमंडल व सांघिक कार्यालयाकरिता विस्तारीत क्र.)

८) वेतनगट: एक ☐ दोन ☐ तीन ☐ चार ☐
(लागू असेल त्याठिकाणी [✓] अशी खूण करावी)

९) जात:
(लागू असेल त्याठिकाणी [✓] अशी खूण करावी)
व जातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत जोडावी.

१) अनुसूचित जाती ☐
२) अनुसूचित जमाती ☐
३) विमुक्त जाती / भटक्या जमाती ☐
४) इतर मागासवर्गीय ☐
५) खुला वर्ग (Open) ☐

१०) उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा :
व तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्याची तारीख

११) उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा : व तत्सम परीक्षेला बसलेल्या शाळेचे व केंद्राचे नाव व पत्ता
अ) केंद्र
ब) एच. एस. सी. बोर्डाचे नाव
क) शाळेचे नाव

१२) मिळालेले एकूण गुण व गुणांची : टक्केवारी
अ) एकूण गुण ______
ब) मिळालेले गुण ______
क) गुणांची टक्केवारी ______

१३) पुढील शिक्षण चालू ठेवण्यासाठी ज्या : शाळेत / कॉलेजात प्रवेश घेतला त्याचे नाव व पत्ता (प्रवेश घेतल्याचा दाखला सोबत जोडावा)

**महत्वाची सुचना :**

१. गुणपत्रिका व प्रवेश फी पावतीची साक्षांकित प्रत जोडावी.
२. कर्मचाऱ्याचा पाल्य मागासप्रवर्गात मोडत असल्यास पाल्यांच्या जातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत.
३. कर्मचाऱ्याचा पाल्य अनुसुचित जमाती या मागासप्रवर्गातील असल्यास पाल्याच्या / कर्मचाऱ्याच्या जातीच्या दाखल्याची जात वैधता प्रमाणपत्रासह साक्षांकित प्रत जोडावी.

**अर्जदाराची सही**

**मी, श्री. / श्रीमती ______________________ हुद्दा ______________ महावितरण / महानिर्मिती / महापारेषण कंपनीच्या ______________ या कार्यालयामध्ये काम करीत असून, असे नमूद करतो / करते की, माझा पाल्य कुमार / कुमारी ______________ याच्या संदर्भात वरीलप्रमाणे मी दिलेली माहिती सत्य आहे. संपर्कासाठी माझा भ्रमणध्वनी क्रमांक ______________ असा आहे.**

**कर्मचाऱ्याची सही**

दिनांक :

प्रती :

असे प्रमाणित करण्यात येते की, माझ्या माहितीनुसार संबंधीत कर्मचाऱ्याने त्याच्या पाल्यासंदर्भात वर दिलेली माहिती पडताळून पाहण्यात आली असून ती बरोबर आहे.

**नियंत्रण अधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्का**